मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482

इंद्रायणीनगरला स्वतंत्र मनपा दवाखाना मिळणार?

दवाखाना उभारण्यासाठी डॉ. सुहास कांबळे यांचा प्रशासनाकडे पाठपुरावा

» पिंपरी | प्रतिनिधी

इंद्रायणीनगरमधील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र महानगरपालिका दवाखाना उभारण्याची मागणी जोर धरू लागली आहे. प्रभाग क्रमांक ८ मधील सेक्टर क्रमांक २ येथे मनपा दवाखान्यासाठी आरक्षित असलेल्या २२ गुंठे जागेपैकी दोन गुंठ्यांवर नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्राचे काम सुरू झाले आहे. मात्र, उर्वरित जागेवर स्वतंत्र दवाखान्याची इमारत उभारण्याची मागणी नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी केली आहे. यासाठी त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदन देऊन पाठपुरावा सुरू केला आहे.

इंद्रायणीनगर परिसराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता नागरिकांना जवळच वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. प्राथमिक आरोग्य सेवांसोबतच नियमित उपचारांसाठी स्वतंत्र दवाखाना उभारल्यास परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. याच पार्श्वभूमीवर आरक्षित भूखंडावर सुरू असलेल्या नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्राच्या कामाची डॉ. कांबळे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामाची सद्यस्थितीची माहिती घेतली. त्यांच्यासोबत डॉ. पोटे आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

महानगरपालिका दवाखान्यासाठी आरक्षित असलेल्या एकूण २२ गुंठे जागेपैकी दोन गुंठ्यांवर आरोग्य मंदिर केंद्र उभारण्यात येत आहे. त्यामुळे उर्वरित जागेचा वापर करून स्वतंत्र मनपा दवाखान्याची इमारत उभारावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या माध्यमातून नागरिकांना अधिक व्यापक आणि नियमित आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुहास कांबळे यांनी या विषयासाठी पुढाकार घेतला आहे. स्वतंत्र दवाखान्याच्या उभारणीसाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही लवकर पूर्ण करून बांधकामाला सुरुवात करावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्र सुरू झाल्यानंतर नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे. मात्र, परिसराची वाढती गरज लक्षात घेता स्वतंत्र मनपा दवाखानाही उभारणे आवश्यक असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे आरक्षित जागेवरील उर्वरित भूखंडाचा वापर कसा केला जाणार आणि स्वतंत्र दवाखान्याच्या मागणीवर प्रशासन कोणता निर्णय घेणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

आयुक्तांना निवेदन देण्यात आले असले, तरी स्वतंत्र दवाखान्याच्या बांधकामासाठी अद्याप कोणती कालमर्यादा निश्चित झाली आहे, याची माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या मागणीवर महापालिका प्रशासनाकडून पुढील कार्यवाही कधी होते, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

> “इंद्रायणीनगर आणि परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या जवळच उपलब्ध व्हाव्यात, हा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. महानगरपालिका दवाखान्यासाठी २२ गुंठे जागा आरक्षित असून, त्यापैकी दोन गुंठे जागेवर नागरी आयुष्मान आरोग्य मंदिराचे काम सुरू झाले आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र, परिसराची गरज लक्षात घेता उर्वरित जागेवर स्वतंत्र आणि सुसज्ज महानगरपालिका दवाखान्याची इमारत उभारणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी मी आमचे नेते आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले असून, दवाखान्याच्या इमारतीचे काम लवकरात लवकर सुरू व्हावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार आहे. नागरिकांना प्राथमिक उपचारांसह आवश्यक वैद्यकीय सेवा वेळेत आणि सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”
>
> -डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड

स्वतंत्र दवाखाना गरजेचा!

इंद्रायणीनगर परिसरात नागरिकांची संख्या वाढत असताना आरोग्य सुविधांवरील ताणही वाढण्याची शक्यता आहे. केवळ आरोग्य मंदिर केंद्रावर अवलंबून न राहता उर्वरित आरक्षित जागेवर स्वतंत्र मनपा दवाखाना उभारल्यास स्थानिकांना वेळेत उपचार मिळण्यास मदत होईल. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या मागणीला प्राधान्य देऊन बांधकामाचा मार्ग मोकळा करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

टेलिग्रामवरील शेअर बाजारात नफ्याचे आमिष; महिलेला ४८.८८ लाखांचा गंडा!

» पिंपरी | प्रतिनिधी

ऑनलाइन शेअर बाजारात गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत पुनावळे येथील एका ३५ वर्षीय महिलेची ४८ लाख ८८ हजार ८५ रुपयांची फसवणूक करण्यात आली. टेलिग्रामवरील शेअर मार्केट ग्रुपमध्ये सहभागी करून घेत संशयितांनी महिलेकडून विविध बँक खात्यांवर पैसे जमा करून घेतले. मात्र, गुंतवलेली रक्कम परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी रावेत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना ७ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पुनावळे येथील बांदलनगर परिसरात घडली. याप्रकरणी संबंधित महिलेने शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी रावेत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयितांनी टेलिग्रामच्या माध्यमातून महिलेशी संपर्क साधला. यावेळी ‘विल्यम ॲनालिस्ट’ या नावाने संपर्क साधणारी व्यक्ती, टेलिग्रामवरील एक महिला आणि कस्टमर केअरच्या नावाने संपर्क करणाऱ्या संशयितांचा सहभाग असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. संशयितांनी महिलेला ‘शेअर मार्केट ए-०३’ या टेलिग्राम ग्रुपमध्ये सहभागी करून घेतले. त्यानंतर ऑनलाइन शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, असे आमिष दाखवून तिला पैसे गुंतवण्यास प्रवृत्त केले. संशयितांच्या सांगण्यावरून महिलेने विविध बँक खात्यांमध्ये आरटीजीएस आणि ऑनलाइन पद्धतीने पैसे जमा केले.

अशा प्रकारे संशयितांनी महिलेकडून एकूण ४८ लाख ८८ हजार ८५ रुपये स्वीकारले. मात्र, गुंतवणुकीची रक्कम आणि त्यावरील नफा परत न करता तिची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

सोनिगरा ज्वेलर्सच्या 'गौरव स्त्रीशक्तीचा' सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद!

दिवाळीनिमित्त नवीन दागिन्यांच्या कलेक्शनने वेधले महिलांचे लक्ष; फेस्टिव्हल ऑफर्सचा घेतला लाभ

>> पिंपरी | प्रतिनिधी

दिवाळी सणाचे औचित्य साधून चिंचवड येथील एसजेपीएल (SJPL) सोनिगरा ज्वेलर्सच्या वतीने आयोजित 'गौरव स्त्रीशक्तीचा' या विशेष सोहळ्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान आणि त्यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात दिवाळीनिमित्त सादर करण्यात आलेल्या नवीन दागिन्यांच्या आकर्षक कलेक्शनने उपस्थित महिलांना भुरळ घातली. यावेळी महिलांनी फेस्टिव्हल ऑफर्सचा लाभ घेत खरेदीचा आनंदही लुटला.

चिंचवड येथील एसजेपीएल सोनिगरा ज्वेलर्सच्या दालनात शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. एसजेपीएल सोनिगरा ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक राहुल रमेश सोनिगरा यांच्या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सहभाग लाभला. सामाजिक, राजकीय, वैद्यकीय, उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रांतील महिलांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सोनिगरा ज्वेलर्सच्या वतीने सादर करण्यात आलेले नवीन दागिन्यांचे कलेक्शन कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देणाऱ्या आकर्षक डिझाइन्स, कलात्मक दागिने आणि वैविध्यपूर्ण कलेक्शनने उपस्थित महिलांचे लक्ष वेधून घेतले. सणासुदीच्या काळात आपल्या आवडीचे दागिने निवडण्यासाठी महिलांनी विशेष उत्सुकता दाखवली. दिवाळीनिमित्त उपलब्ध करून देण्यात आलेल्या फेस्टिव्हल ऑफर्सनाही चांगला प्रतिसाद मिळाला.

या सोहळ्यात एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईजेसच्या संचालिका मनीषा थोरात-पिसाळ, नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेविका सुलभा उबाळे, डॉ.भाग्यश्री लहाने मुंडे, उद्योजिका राजश्री गागरे, उद्योजिका प्रीती बोंडे, उद्योजिका इंद्रायणी काळकुटे, डॉ. प्रेरणा गोपाळे, डॉ. ज्योती काळे, डॉ. पूनम कराळे, डॉ. स्वाती पवार, डॉ. तेजस्वी पुजारी, लिओज फिटनेस क्लबच्या स्नेहा वैरागडे, डॉ. अश्विनी माटे, डॉ. यामिनी सदाबहार, डॉ. प्रगती सरडे, संगीता शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एसजेपीएल सोनिगरा ज्वेलर्सच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले.

कुटुंबाच्या जडणघडणीपासून समाजाच्या प्रगतीपर्यंत महिलांचे योगदान अनमोल आहे. विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिलांना एकत्र आणून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या भावनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिवाळीच्या आनंदोत्सवाला स्त्रीशक्तीच्या सन्मानाची जोड देत एसजेपीएल सोनिगरा ज्वेलर्सने सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. मान्यवर महिलांचा सहभाग, नवीन दागिन्यांचे आकर्षक कलेक्शन आणि सणासुदीच्या विशेष ऑफर्समुळे हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

> ""स्त्री ही प्रत्येक कुटुंबाची खरी शक्ती आणि समाजाच्या प्रगतीचा भक्कम आधार आहे. घर, व्यवसाय, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात महिला आपल्या कर्तृत्वाने नवनवे आदर्श निर्माण करत आहेत. अशा कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करणे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. दागिने हे केवळ सौंदर्याचे प्रतीक नसून महिलांच्या जिव्हाळ्याच्या भावना, परंपरा आणि विश्वासाशी जोडलेले असतात. एसजेपीएल सोनिगरा ज्वेलर्सने गेल्या सात दशकांहून अधिक काळ जपलेला ग्राहकांचा विश्वास हीच आमची खरी संपत्ती आहे. 'गौरव स्त्रीशक्तीचा' या उपक्रमातून महिलांच्या कर्तृत्वाला सलाम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या सोहळ्याला महिलांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आमच्यासाठी प्रेरणादायी आहे."
>
> -राहुल रमेश सोनिगरा,
> **व्यवस्थापकीय संचालक,**
> **एसजेपीएल सोनिगरा ज्वेलर्स**

वाकडमध्ये पहाटे भीषण आग; सहा ते सात दुकाने जळाली!

>> पिंपरी | प्रतिनिधी

वाकड येथील प्रिस्टीन प्रो लाईफ परिसरातील दुकानांना सोमवारी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत सहा ते सात दुकाने आगीच्या विळख्यात सापडली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. रहाटणी, थेरगाव आणि मुख्य अग्निशमन केंद्राच्या वाहनांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात यश आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नसल्याची माहिती अग्निशमन विभागाने दिली.

अग्निशमन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे ३ वाजून ५६ मिनिटांनी उज्ज्वल गुप्ता यांनी रहाटणी उप अग्निशमन केंद्राला आगीची वर्दी दिली. त्यानंतर अग्निशमन दलाचे जवान तातडीने प्रिस्टीन प्रो लाईफ परिसरात दाखल झाले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर सहा ते सात दुकानांना आग लागल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

आगीची तीव्रता लक्षात घेऊन जवानांनी होज आणि होज रीलच्या साहाय्याने पाण्याचा मारा सुरू केला. दुकानांमध्ये लागलेली आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन वाहनाच्या विंचच्या मदतीने शटर तोडण्यात आले. त्यानंतर दुकानांच्या आतील भागात कूलिंग करण्यात आले. तसेच उर्वरित दुकानांवर पाण्याचा मारा करून आग पुन्हा भडकण्याचा धोका कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

आगीमुळे संभाव्य नुकसान वाढू नये, यासाठी जवानांनी सॅल्व्हेजिंगची प्रक्रियाही राबवली. या मोहिमेदरम्यान रहाटणी उप अग्निशमन केंद्राच्या जवानांना थेरगाव उप अग्निशमन केंद्र आणि मुख्य अग्निशमन केंद्राच्या अग्निशमन वाहनांची मदत मिळाली.

पहाटेच्या वेळी घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून आग विझवण्यासाठी प्रयत्न केल्याने परिस्थिती नियंत्रणात आणता आली. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नसल्याचे अग्निशमन विभागाने स्पष्ट केले. मात्र, आगीचे नेमके कारण आणि दुकानांमधील आर्थिक नुकसानीचा तपशील समजू शकलेला नाही.

खेळांची मैदाने धूळखात; मोशीत 151 एकरांवर गोल्फ कोर्सचा घाट!

अण्णासाहेब मगर स्टेडियम सात वर्षांपासून रखडले; गोल्फ कोर्ससाठी १० आरक्षणे बदलण्याचा प्रस्ताव

पिंपरी | प्रतिनिधी

शहरातील खेळांची मैदाने आणि क्रीडा सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याची परिस्थिती असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून मोशीतील बोऱ्हाडेवाडी येथे तब्बल १५१.६७ एकर जागेवर गोल्फ कोर्स आणि क्लब विकसित करण्याची तयारी सुरू आहे. या प्रकल्पासाठी विकास आराखड्यातील ६१.३८ हेक्टर जागेवरील दहा आरक्षणे बदलण्याचा प्रस्ताव आहे. दुसरीकडे, नेहरूनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडियम सात वर्षांपासून रखडले असून, मोशीतील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमचाही प्रस्ताव प्रत्यक्षात आलेला नाही. त्यामुळे शहरातील मूलभूत क्रीडा सुविधांना प्राधान्य द्यायचे की कोट्यवधींचा खर्च करून गोल्फ कोर्स उभारायचा, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र, त्या तुलनेत सार्वजनिक मैदाने आणि क्रीडा सुविधांचा विकास झालेला नसल्याच्या तक्रारी खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडा शिक्षकांकडून केल्या जात आहेत. अनेक भागांत मुलांना सरावासाठी पुरेशी मैदाने उपलब्ध नाहीत. काही ठिकाणी उपलब्ध मैदानांचीही योग्य देखभाल होत नसल्याने खेळाडूंना अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही भागांत मुलांना नाइलाजाने मोकळ्या जागांवर आणि रस्त्यांवर खेळावे लागत आहे.

अशा परिस्थितीत महापालिकेने मोशीतील विस्तीर्ण जागेवर गोल्फ कोर्स आणि क्लब विकसित करण्याचा प्रस्ताव पुढे आणला आहे. शहराला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणे आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उभारणे, हा यामागील उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, शहरातील विद्यमान क्रीडा सुविधांची दुरवस्था आणि रखडलेले प्रकल्प पाहता या प्राधान्यक्रमावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सात वर्षांपासून अण्णासाहेब मगर स्टेडियम रखडले नेहरूनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडियम २०१९ मध्ये जमीनदोस्त करण्यात आले. या जागेवर वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्सच्या धर्तीवर क्रीडा संकुल उभारण्याची योजना आखण्यात आली होती. तत्कालीन महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी या प्रकल्पाचे सादरीकरण पदाधिकारी आणि गटनेत्यांसमोर केले होते. मात्र, त्यानंतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीला अपेक्षित गती मिळाली नाही. परिणामी, स्टेडियमची जागा गेल्या सात वर्षांपासून वापराविना पडून आहे.

सांगवी, नवी सांगवी आणि पिंपळे गुरव परिसरातही महापालिकेचे स्वतंत्र क्रीडांगण उपलब्ध नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे खेळाडूंना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) मैदानावर सराव करावा लागत असल्याचे सांगितले जाते. अशा वेळी उपलब्ध जागांवर क्रीडा सुविधा विकसित करण्याऐवजी नव्या गोल्फ कोर्ससाठी मोठ्या प्रमाणात जागा राखून ठेवण्याच्या नियोजनावरून चर्चा सुरू झाली आहे.

६१.३८ हेक्टरवरील दहा आरक्षणे बदलण्याचा प्रस्ताव मोशी येथील गट क्रमांक ३२७, ४३५, ४३६, ४३७, ४३८, ४३९, ४४०, ४४१, ४४२ आणि ४४३ या जागांवर विकास आराखड्यानुसार विविध सुविधांसाठी आरक्षणे निश्चित करण्यात आली आहेत. एकूण ६१.३८ हेक्टर म्हणजेच १५१.६७ एकर क्षेत्रावर गोल्फ कोर्स आणि क्लबचे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे.

या जागेवर १२ मीटर आणि १८ मीटर रुंदीचे रस्ते, पार्किंग, दोन रिक्रिएशन कॉम्प्लेक्स, तीन एसएससीसी आरक्षणे आणि जलाशय अशा विविध सुविधांसाठी जागा राखीव आहे. गोल्फ कोर्सच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास या दहा आरक्षणांमध्ये बदल करावा लागणार आहे. त्यामुळे नियोजनात समाविष्ट असलेल्या या सुविधांचे भवितव्य काय असणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरात १० टक्के पाणीकपात; नाशिक फाट्यावर लाखो लिटर पाणी वाया!

पिंपरी | प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड शहरात १० टक्के पाणीकपात लागू असताना नाशिक फाटा सिग्नल परिसरात मुख्य जलवाहिनीमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. एकीकडे नागरिकांना अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे, तर दुसरीकडे जलवाहिनीतील गळतीमुळे पिण्याचे पाणी रस्त्यावर वाहत असल्याने महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

महापालिकेकडून नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जात असताना दुसरीकडे नाशिक फाटा परिसरात मुख्य जलवाहिनी आणि व्हॉल्व्हमधून मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर वाहत असल्याचे चित्र आहे. शहरात १० टक्के पाणीकपात लागू असताना अशा प्रकारे पिण्याचे पाणी वाया जात असल्याने महापालिकेच्या पाणीपुरवठा नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. जलवाहिनीतील गळतीमुळे रस्त्यावर पाण्याचे पाट वाहत असून, या पाण्याचा उपयोग होण्याऐवजी त्याचा अपव्यय होत आहे. पाणी बचतीचे आवाहन करणाऱ्या प्रशासनानेच गळती रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

शहरातील अनेक सोसायट्या आणि वस्त्यांमध्ये अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना दैनंदिन गरजा भागवण्यासाठी खासगी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. पिण्याचे पाणी, स्वयंपाक, स्वच्छता आणि इतर घरगुती कामांसाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याने सोसायट्यांना अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. काही ठिकाणी टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. अशा परिस्थितीत महापालिकेच्या मुख्य जलवाहिनीतून पाणी मोठ्या प्रमाणात वाहून जात असल्याचे दिसत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. एका बाजूला पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याची गरज असताना दुसऱ्या बाजूला जलवाहिनीतील गळतीमुळे पाणी वाया जाणे ही चिंतेची बाब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी आणि जलवाहिन्यांमधील गळती आढळल्यास ती तातडीने दुरुस्त करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश दिले आहेत. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर या सूचनांना विशेष महत्त्व आहे. मात्र, नाशिक फाटा परिसरातील प्रकारामुळे या निर्देशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत होत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मुख्य जलवाहिनी किंवा व्हॉल्व्हमधून गळती सुरू झाल्यानंतर ती वेळीच निदर्शनास येऊन दुरुस्ती होणे आवश्यक आहे. त्यासाठी पाणीपुरवठा विभागाने नियमित पाहणी, तक्रारींची तातडीने दखल आणि आपत्कालीन दुरुस्ती यंत्रणा अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे.

नाशिक फाटा हा शहरातील महत्त्वाचा आणि वर्दळीचा चौक असल्याने या परिसरातील जलवाहिनीच्या गळतीकडे दुर्लक्ष होणे परवडणारे नाही. रस्त्यावर वाहणाऱ्या पाण्यामुळे पाण्याचा अपव्यय होण्याबरोबरच वाहनचालक आणि पादचाऱ्यांनाही गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे गळतीचे नेमके कारण शोधून संबंधित जलवाहिनी किंवा व्हॉल्व्हची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच, गळती किती काळ सुरू होती, किती पाणी वाया गेले आणि दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली, याबाबतही प्रशासनाने स्पष्ट माहिती देणे गरजेचे आहे.

शहरातील पाणीगळती रोखण्यासाठी केवळ एखाद्या ठिकाणी दुरुस्ती करून थांबणे पुरेसे ठरणार नाही. महापालिकेने संपूर्ण शहरातील जलवाहिन्यांचे वॉटर ऑडिट करणे आवश्यक आहे.

पुणे विद्यापीठाचा मोठा निर्णय; अनधिकृत स्थलांतर करणाऱ्या कॉलेजांना प्रवेशबंदी!

२०२६-२७ पासून नियम लागू; विद्यापीठाची पूर्वपरवानगी आणि राज्य शासनाची मान्यता अनिवार्य

» पुणे | प्रतिनिधी

विद्यापीठाची पूर्वपरवानगी आणि राज्य शासनाची आवश्यक मान्यता न घेता महाविद्यालयाचे स्थलांतर करणाऱ्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यासंदर्भात कठोर भूमिका घेतली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाईचा इशारा दिला आहे. या निर्णयामुळे परवानगीशिवाय महाविद्यालयाचे ठिकाण बदलणाऱ्या संस्थांना चाप बसण्याची शक्यता आहे.

विद्यापीठाच्या संलग्नता कक्षाच्या उपकुलसचिवांनी दिलेल्या निर्देशांनुसार, विद्यापीठाशी संलग्न काही महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांनी आवश्यक पूर्वपरवानगी व विहित प्रक्रिया पूर्ण न करता स्थलांतर केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने संबंधित संस्थांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार महाविद्यालयाचे स्थलांतर, संस्थेच्या ठिकाणात बदल किंवा व्यवस्थापनासंदर्भातील बदल नियमानुसार करणे आवश्यक आहे. विद्यापीठाची पूर्वपरवानगी न घेता परस्पर निर्णय घेणाऱ्या संस्थांवर कारवाई केली जाऊ शकते. त्यामुळे महाविद्यालयांनी स्थलांतर करण्यापूर्वी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. विद्यापीठाची परवानगी, त्यानंतर शासनाची मान्यता महाविद्यालयाला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करायचे असल्यास केवळ राज्य शासनाची मान्यता मिळाली आहे, या आधारावर स्थलांतर करता येणार नाही. त्यासाठी प्रथम विद्यापीठाकडे अर्ज सादर करून आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) प्राप्त करणे आणि त्यानंतर नियमानुसार राज्य शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम ११८ मधील तरतुदींनुसार राज्य शासनाची सहमती आणि विद्यापीठाची आवश्यक परवानगी यासंदर्भातील प्रक्रिया पूर्ण करावी लागते. तसेच, कलम १०८ (१) (ब) मधील तरतुदींनुसार महाविद्यालयाच्या किंवा परिसराच्या ठिकाणात बदल करण्यासाठी विद्यापीठाची पूर्वपरवानगी आवश्यक असल्याचे निर्देशांत स्पष्ट करण्यात आले आहे. नियम मोडल्यास प्रवेश देता येणार नाही विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेता आणि राज्य शासनाची आवश्यक मान्यता प्राप्त न करता स्थलांतर करणाऱ्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी स्थलांतराचा निर्णय घेताना नियमांनुसार आवश्यक परवानग्या आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे आहे.

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांनी या निर्देशांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अनधिकृत स्थलांतराच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने घेतलेल्या या भूमिकेमुळे नियमबाह्य पद्धतीने ठिकाण बदलणाऱ्या संस्थांवर कारवाई होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित महाविद्यालये या निर्देशांचे पालन कशा प्रकारे करतात, याकडे लक्ष लागले आहे.

चारित्र्याच्या संशयातून पत्नीच्या जीवाशी खेळ; पतीला ७ वर्षांची शिक्षा!

» पुणे | प्रतिनिधी

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला कॅल्शिअमच्या गोळ्या असल्याचे भासवत कॅप्सूलमधून ब्लेडचे तुकडे खाऊ घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पतीला न्यायालयाने सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. सोमनाथ साधू सपकाळ (वय ४५, रा. शिवणे) असे दोषी ठरविण्यात आलेल्या पतीचे नाव आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश अनिरुद्ध गांधी यांनी हा निकाल दिला. न्यायालयाने आरोपीला सात वर्षांच्या सक्तमजुरीसह ७० हजार रुपयांचा दंडही ठोठावला.

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतल्यामुळे आरोपीने हे कृत्य केल्याचे प्रकरणातून समोर आले. पत्नीला कॅल्शिअमच्या गोळ्या देत असल्याचे भासवून कॅप्सूलमधून ब्लेडचे तुकडे खाऊ घालण्यात आले. सुरुवातीला या प्रकाराची कल्पना नसलेल्या पत्नीला ऑक्टोबर २०२३ मध्ये पोटात तीव्र वेदना होऊ लागल्या. तिचा त्रास वाढत गेला. दोन वेळा शौचावाटे ब्लेडचे तुकडे बाहेर पडल्याने हा प्रकार गंभीर असल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर ८ नोव्हेंबर रोजी पत्नीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तिची तपासणी केली असता पोटात ब्लेडचा तुकडा असल्याचे आढळून आले. त्यामुळे तिच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता होती. डॉक्टरांनी ११ नोव्हेंबर रोजी शस्त्रक्रियेद्वारे किंवा वैद्यकीय प्रक्रियेतून हा तुकडा बाहेर काढला. या घटनेनंतर पत्नीला ब्लेडचे तुकडे खाऊ घातल्याचा प्रकार उघडकीस आला आणि प्रकरणाने गंभीर वळण घेतले.

या प्रकरणी उत्तमनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास करून आरोपीविरोधात न्यायालयात खटला दाखल केला.

खटल्याच्या सुनावणीदरम्यान पत्नीने पतीविरोधातील आरोप नाकारले. तसेच मुलानेही वडिलांविरोधात साक्ष दिली नाही. त्यामुळे साक्षीदारांच्या जबाबांवरूनच नव्हे, तर इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारेही न्यायालयाला या प्रकरणाचा विचार करावा लागला.

सुनावणीदरम्यान डॉक्टरांनी दिलेली साक्ष या खटल्यात महत्त्वाची ठरली. पोटात आढळलेला ब्लेडचा तुकडा प्राणघातक ठरू शकला असता, असे डॉक्टरांनी न्यायालयात स्पष्ट केले. पत्नीच्या पोटातून ब्लेडचा तुकडा बाहेर काढण्यात आल्याचे वैद्यकीय पुरावेही न्यायालयासमोर सादर करण्यात आले. पत्नी आणि मुलाने आरोपीविरोधात साक्ष दिली नसली, तरी वैद्यकीय पुरावे आणि इतर साक्षीदारांचे जबाब न्यायालयाने विचारात घेतले.

उपलब्ध पुरावे आणि साक्षींच्या आधारे अतिरिक्त सत्र न्यायाधीश अनिरुद्ध गांधी यांनी सोमनाथ सपकाळ याला दोषी ठरवले. त्याला सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यासोबतच ७० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या या प्रकरणात न्यायालयाने दिलेला निकाल महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

वैद्यकीय पुराव्यांनी आरोपी दोषी!

या खटल्यात पत्नीने पतीविरोधातील आरोप नाकारले, तर मुलानेही वडिलांविरोधात साक्ष दिली नाही. मात्र, न्यायालयाने केवळ साक्षीदारांच्या जबाबांवर अवलंबून न राहता वैद्यकीय पुरावे आणि डॉक्टरांची साक्ष विचारात घेतली. पत्नीच्या पोटात आढळलेला ब्लेडचा तुकडा प्राणघातक ठरू शकला असता, असे डॉक्टरांनी स्पष्ट केले. उपचारादरम्यान ब्लेडचा तुकडा बाहेर काढण्यात आल्याची वैद्यकीय माहितीही महत्त्वाची ठरली. उपलब्ध पुरावे आणि इतर साक्षीदारांचे जबाब ग्राह्य धरून अतिरिक्त सत्र न्यायाधीश अनिरुद्ध गांधी यांनी सोमनाथ सपकाळ याला दोषी ठरवले. न्यायालयाने त्याला सात वर्षे सक्तमजुरी आणि ७० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.